वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. १० जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## चिक्की घोटाळ्यावरून आपण विधानसभेत जोर जोरात भाषण करून आपल्या बहिणींचा राजीनामा मागितला होता



# धनूभाऊ प्रत्येकांवर वेळे येते! आठवतंय का?

### आज तिच वेळ तुमच्यावर आली असुन पण त्या बहिणीने आपला राजीनामा मागण्याऐवजी आपले मंत्रीपद वाचविण्यासाठी प्रयत्न केले

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## किरकोळ आरोप झाला तरी मंत्री, मुख्यमंत्र्यांनी राजीनामे दिल्याचा महाराष्ट्राचा इतिहास



## नातं नात्याच्या ठिकाणी, राजकारण राजकारणाच्या ठिकाणी,हा आपलाच डायलॉग

बीड, (दिव्य न्युज):- प्रसंग नऊ-दहा वर्षांपूर्वीचा असावा. विधान परिषदेत विरोधी पक्षनेता असलेला भाऊ आणि मंत्री असलेल्या बहिणीत वाकयुद्ध रंगले होते. भावाने बहिणीच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. मंत्री असलेल्या बहिणीवर २०६ कोटी रुपयांच्या कथित चिक्की घोटाळ्याचा आरोप भावाने केला होता. त्या दिवशी विधान परिषदेचे कामकाज काही वेळ स्थगितही करावे लागले होते. बरोबर ओळखलात, त्यावेळी धनंजय मुंडे विरोधी पक्षनेते होते आणि पंकजा मुंडे महिला व बालविकास मंत्री होत्या. नाते नात्याच्या ठिकाणी, राजकारण राजकारणाच्या ठिकाणी, असे धनंजय मुंडे त्यावेळी म्हणाले होते.

गेल्या महिनाभरापासून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे वरील प्रसंग आठवला. आता राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे चर्चेत आले आहेत. मुंडे यांचा निकटवर्तीय असलेला वाल्मिक कराड पोलिस कोठडीत आहे. तीन कोटी रुपयांच्या खंडणीचे हे प्रकरण आहे. मस्साजोग (ता. केज, जि. बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. यातील आरोपी वाल्मिक कराड याच्या जवळचे असल्याचे सांगितले जात आहे. धनंजय मुंडे आणि कराड यांचे संबंध सर्वांना माहित आहेत. त्यात लपवून ठेवण्यासारखे काहीही

▶▶ पान २ वर

# मुन्नी बदनाम हुई डार्लिंग तेरे लिए...

## अजित पवार गटातील ती बडी मुन्नी कोण? अखेर सुरेश धस यांनीच केला उलगडा




बीड, (दिव्य न्युज):- बीडमध्ये धगधगत असलेल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामध्ये भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी कमालीची आक्रमक भूमिका घेतली आहेत. एकीकडे सुरेश धस हे या प्रकरणातील एक आरोपी वाल्मिक कराड याच्याशी असलेल्या निकटच्या संबंधांवरून धनंजय मुंडे यांना सातत्याने टीकेचं लक्ष्य करत आहेत. तर दुसकीकडे सुरेश धस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात एक बडी मुन्नी आहे, असा उल्लेख करत खळबळ उडवून दिली होती. तेव्हापासून अजित पवार गटातील ती बडी मुन्नी कोण, याबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात होते. आता स्वत: सुरेश धस यांनीच त्या मुन्नीबाबत मोठा उलगडा केला आहे.

▶▶ पान २ वर

### एफसी रोडवर ४० कोटीची दुकानं, मगरपट्ट्यात ७५ कोटीचा फ्लॅट अन् जमीनी

# वाल्मिक कराडची पुण्यातील मोह माया



पुणे , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रमुख संशयित आरोपी वाल्मिक कराड ३१ डिसेंबर रोजी शरण आला. तब्बल २२ दिवसांनंतर त्याने शरणागती पत्करली. त्याच्या तपासासाठी सीआयडीची नऊ पथके त्याचा शोध घेत होती. पण अखेर वाल्मिक कराड याने शरण येण्याची वेळ आणि स्थळ स्वत:च ठरवले आणि ३१ डिसेंबर रोजी त्याने आत्मसमर्पण केले.त्यानंतर रोज मोठे खुलासे होत आहे. राज्यातील विविध शहरात कराडचे बँक खाती, वेगवेगळ्या शहरात मालमत्ता असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.एवढच नाही तर पुण्यात सर्वात हायप्रोफाईल समजल्या मगरपट्टा सिटी आणि एफसी रोड भागात वाल्मिक कराडची कोट्यवधी रुपयांची प्रॉपर्टी असल्याचे समोर आले आहे. जवळपास ११५ कोटीची प्रॉपर्टी आज सुरेश धसांनी भर सभेत उघड केली आहे.

▶▶ पान २ वर

# मुस्लिमांपाठोपाठ मराठा अन् ओबीसीही अस्वस्थ

## महाराष्ट्राच्या शांततामय सहजीवनाला दृष्ट लागली

**बीड , (दिव्य न्युज):- कोणत्याही देशाच्या, राज्याच्या, समाजाच्या प्रगतीसाठी शांततामय सहजीवन ही पहिली अट असते. त्यासाठी सर्वच समाजांनी पुढाकार घ्यायला हवा. राजकारण्यांचा डाव वेळीच ओळखून समाजात शांतता कशी नांदेल, याचा विचार आता लोकांनाच करावा लागेल; कारण राजकारण, सत्ताकारण तर समाजात दुही निर्माण करण्यासाठी कायम सज्ञच असते.**

राज्यातील सामाजिक परिस्थिती सुजाण नागरिकांना अस्वस्थ करणारी आहे. कोणताही वाद झाला, आक्षेपार्ह घटना घडली की त्याला जात, धर्माचा रंग दिला जात आहे. त्यामुळे मूळ प्रश्न बाजूला पडून भलतीच गुंतागुंत निर्माण होत आहे. जातीय, धार्मिक सलोखा संपुष्टात येतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

समाजासमाजांमधील समंजसपणा लोप पावत चालला आहे. साहित्यिक, बुद्धीजीवी वर्तुळातून याबाबत ब्र ही उच्चारला जात नाही. पुढच्या पिढीच्या पदरात

दिव्य वार्ता
विशेष

आपण नको ती संकटे टाकत आहोत, याचे भान समाजाने ठेवायला हवे. मस्साजोग (ता. केज, जि. बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येनंतर वातावरण ढवळून निघाले आहे. विविध शहरांत आक्रोश मोर्चे काढले जात आहेत.

आमच्या समाजावर अन्याय झाला तर त्यांना घरात घुसून बाहेर काढावेच लागणार आहे, असा इशारा परभणी येथील आक्रोश मोर्चात मनोज जरांगे पाटील यांनी दिला होता. त्यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ मंत्री धनंजय मुंडे यांच्या समर्थकांनी आंदोलन केले. त्यानंतर जरांगे पाटील यांच्यावर चार ठिकाणी गुन्हे दाखल झाले आहेत. प्रार्थनास्थळात घुसून

▶▶ पान २ वर

# सीआयडी कोठडीत वाल्मीक कराडची झोप उडाली

### डोळे लालबुंद अन् प्रचंड तणाव, डॉक्टरांकडून तपासणी!


बीड , (दिव्य न्युज):- पवनचक्की कंपनीला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याच्या आरोपात सीआयडी कोठीत असणाऱ्या वाल्मीक कराडची अवस्था बिकट झाली आहे. वाल्मीक कराड सध्या तणावात असून त्याला व्यवस्थित झोपही येत नसल्याने त्याचे डोळे लाल झाले होते. डॉक्टरांनी बुधवारी सायंकाळी ७ वाजता त्याची तपासणी केली. त्यानंतर नेत्ररोग तज्ज्ञांना कॉल दिला. ९ वाजता त्यांनी तपासणी करून औषधोपचार केले.

जास्तीचे जागरण आणि तणावामुळे असे डोळे लाल होऊ शकतात, असं तज्ज्ञांनी सांगितलं. वाल्मीक कराड याने विष्णू चाटेच्या मोबाइलवरून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणी मागितल्याचा आरोप आहे. याबाबतचे कॉल रेकॉर्डिंगही सीआयडीच्या

▶▶ पान २ वर

# संतोष देशमुखांचे हत्या प्रकरण मानवाधिकार आयोगाकडे

### खासदार सोनवणेंच्या मागणीला यश



बीड , (दिव्य न्युज):- केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोश देशमुख यांची महिन्याभरापूर्वी म्हणजेच ०९ डिसेंबरला अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणी संतोष देशमुखांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्याकरिता राज्यभरात जनआक्रोश मोर्चा काढण्यात येत आहे. या जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे सुद्धा आपल्या पद्धतीने सर्व प्रयत्न करत असून संतोष देशमुखांसाठी लढा देत आहेत. अशातच खासदार सोनवणे यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली येथे आयुक्तांची भेट घेऊन मस्साजोग येथील

▶▶ पान २ वर

# परळी तालुक्यात वर्षभरात तीन खून

### १६१ अकस्मात मृत्यूची नोंद, सहाजणांची ओळख पटली नाही

परळी , (दिव्य न्युज):- गत वर्षभरात परळी शहर व तालुक्यात तिघांचे खून झाले असून या प्रकरणी परळी शहर, संभाजीनगर व ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या तिन्ही घटना उघडकीस आलेल्या आहेत. मागील वर्षामध्ये विषारी द्रव्यप्राशन, आत्महत्या व अन्य कारणांमुळे परळी तालुक्यातील चार पोलिस ठाण्यांच्या हद्दीत एकूण १६१ अकस्मात मृत्यूंची नोंद झालेली आहे.सिरसाळा पोलिस ठाणे हद्दीत २०२४ मध्ये एकही खून झालेला

पान २ वर

### अनाधिकृतरित्या वाळू वाहतूक ; २७ टिप्पर, ७५ कोटी रूपये दंड

# साहेब, वसूल होईल का? टिप्परची किंमत ५० लाख अन् दंड २ कोटी

बीड , (दिव्य न्युज):- गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी टोलनाक्यावरील सीसीटीव्हीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत वाळू वाहतूक करताना दिसलेल्या २७ टिप्पर मालकांना तब्बल ७५ कोटी रुपये दंड भरण्याची नोटीस जिल्हाधिकाऱ्यांनी पाठवली आहे. तीन दिवसांच्या आत खुलासा सादर करावा, असेही आदेशित केले आहे. वास्तविकतः एका टिप्परची किंमतच ५० लाख रुपयांच्या जवळपास आहे. त्यामुळे टिप्पर मालक हा दंड भरतील का? हा प्रश्न आहे.

### पोलिसांना दिल्या सूचना

जिल्हाधिकारी यांच्याकडून अनधिकृतरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या वाहन मालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. सदरील वाहने जप्त करून पुढील निर्देशापर्यंत आपल्या ताब्यात ठेवाव्यात. महाराष्ट्र जमीन महसुलाच्या कार्यवाहीतून मुक्त होत नाहीत तोपर्यंत सोडण्यात येऊ नयेत, अशा सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या आहेत. तसेच संबंधित वाहन गुन्हेगारी कामासाठी वापरले असल्याने तत्काल प्रभावाने रद्द करावेत, असेही सांगण्यात आले आहे



जिल्ह्यातील इतर भागांच्या तुलनेत गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन व इतर ठिकाणी असलेल्या नदीपात्रातून अनधिकृतरीत्या वाळू उपसा करून त्याची सर्रासपणे वाहतूक केली जाते. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाडळशिंगी येथील टोलनाक्यावरून प्रत्येक टिप्पर जाते-येते, ही बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी टोलनाक्यावरील मागील वर्षभराचा सीसीटीव्ही रेकॉर्ड मागवून घेतला. त्यानुसार, सीसीटीव्ही फुटेज पाहून कोणत्या

▶▶ पान २ वर

### ..... यांना दिल्या नोटीसा

| वाहन मालकाचे नाव | वाहन क्रमांक | दिलेला दंड |
|---|---|---|
| हरिचंद्र रघुनाथ सुखदेव (म्हाळस पिंपळगाव, गेवराई) | एमएच २० ईएल ७२४४ | १ कोटी ४६ लाख |
| बिलाल खान आयुब खान (रा. मेहबूबगंज, दिलावरनगर, बीड) | एमएच ०५ डीके ४७४१ | ३ कोटी २ लाख |
| ईश्वर शिवनाथ सुखदेव (रा. म्हाळस पिपळगाव, बीड) | एमएच १२ क्युजी ४२९७ | १ कोटी ३९ लाख |
| समीर बाबूलाल शेख (रा. आहेर वडगाव) | एमएच १२ आरएन ४२९७ | ३ कोटी १० लाख |
| महेश केरुबा गुंड (रा. कुर्ला, बीड) | एमएच २३ एयू २६१७ | १ कोटी २८ लाख |
| बबन अहिलाजी काले (रा. राजापूर, गेवराई) | एमएच १२ एनएक्स ९५९७ | ३ कोटी ५२ लाख |
| रिजवान बशीर शेख (रा. हिरापूर, गेवराई) | एमएच ०४ जीएफ ९५६९ | ५ कोटी ३६ लाख |
| अब्दुल बाशित अब्दुल सत्तार (रा. मोमीनपुरा, बीड) | एमएच २३ एयू २९३५ | २ कोटी ९ लाख |
| महंमद मुझफ्फर अब्दुल बासेत मोमीन (रा. मोमीनपूरा, बीड) | एमएच २३ एयू १७३८ | २ कोटी ४ लाख |
| गजानन भारत मुगुटराव (रा. बाग पिंपळगाव, गेवराई) | एमएच २३ एयू ८८२२ | २ कोटी ७६ लाख |
| मस्के विपुल नवनाथ (रा. पालवण, बीड) | एमएच २३ एयू ६१११ | ५ कोटी ३१ लाख |
| शेख समशीर शेख फेरोज (आदित्य कॉलेज परिसर, बीड) | एमएच २३ एयू ४५९७ | २ कोटी ९७ लाख |
| सुधीर गव्हाणे (मातोरी, शिरूर) | एमएच २३ एयू २७५७ | १ कोटी ४९ लाख |
| निहाल माजीद पठाण (कुर्ला, बीड) | एमएच १७ बीवाय ३२१४ | २ कोटी ५८ लाख |
| शेख जमीर मुबारक (हिरापूर, गेवराई) | एमएच ४८ बीएम ६२८२ | ३ कोटी ७ लाख |
| शेख समशेर शेख फिरोज (रा. आदित्य कॉलेज परिसर, बीड) | एमएच ४२ एक्यू ८१०९ | २ कोटी ५३ लाख |
| अकबर अमीन पठाण (रा. हिरापूर, ता. गेवराई) | एमएच २३ बीके ८८२२ | २ कोटी १७ लाख |
| स्वप्नील शामराव शिंदे (रा. नेकनूरं) | एमएच २३ बीके ७७७४ | १ कोटी |
| शेख जाकेर बशीर (रा. लिंबारुई, ता. बीड) | एमएच २३ एयू ८८५५ | १ कोटी ९३ लाख |
| बाबासाहेब एकनाथ मस्के (रा. पालवण, बीड) | एमएच २३ ईजी ९३३० | २ कोटी ४ लाख |
| अमोल व्यंकटराव गरड (संत नामदेवनगर, बीड) | एमएच २७ बीवाय ३१०१ | ४ कोटी ४५ लाख |
| पठाण आदिलखान अय्युबखान (दिलावरनगर, बीड) | एमएच १२ क्यूजी ४४९७ | २ कोटी ९७ लाख |
| अशोक कांतराव सातपुते (जालना) | एमएच ४२ एक्यू २३०० | २ कोटी ६३ लाख |
| अमजद अमीन पठाण (रा. हिरापूर, ता. बीड) | एमएच २३ एआर ४५१८ | २ कोटी २२ लाख |

# जिल्हाधिकारी साहेब, बीड जिल्ह्यात दारूड्यांची संख्या वाढू नका!

बीड :प्रतिनिधी
बीड जिल्ह्यात एकीकडे गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असताना दुसरीकडे दारूची दुकाने वाढवून समाजाची वाट लावली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन वीस बिअरबारला मंजुरी दिल्याने आता जिल्यातील दारू दुकानांची संख्या आठशे चाळीस वर गेली आहे. आता तरी दारुड्यांची संख्या वाढवू नका. नवीन दारू दुकाने देऊ नका, अशी मागणी जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी मागणी करीत संताप व्यक्त केला.

## 20 लायसन अविनाश पाठक यांनी दिली!

बीड जिल्ह्यात बिअरबार, देशी दारू, वाईन शॉप, होलसेल अशी एकूण आठशे एकोन चाळीस एवढी दारू दुकानांची संख्या आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे या असताना त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात दारू दुकाने दुकानांना परवाना देण्यात आले. दि. १ जानेवारी २०२३ पासून दि. १५ जून २०२४ या साधारणत: दीड वर्षाच्या काळामध्ये शहात्तर नवीन लायसन देण्यात आले. या दिड वर्षात देण्यात आलेल्या शहात्तर लायसन पैकी फक्त वीस लायसन अविनाश पाठक यांनी दिली. बाकीची लायसन तत्पूर्वीच्या जिल्हाधिकारी मुंडे यांनी दिले आहे.



१ जेष्ठ समाज सेवक अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख संतापले!

२ जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे या असताना त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात दारू दुकाने दुकानांना परवाना देण्यात आले!

३ बियरबारला मंजुरी देताना कोट्यावधींचा घोटाळा तर भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर! प्रशासनापेक्षा बाहेरच्या लोकांनीच मलिदा मारल्याची चर्चा

४ एकीकडे गुन्हेगारी पर्व वाढत आहे तर दुसरीकडे मद्य विक्री परवाण्याची संख्या वाढवून जनजीवन विस्कळीत केले!!



## मद्य विक्री परवाण्याची संख्या वाढवून जनजीवन केले विस्कळीत

■ एकीकडे गुन्हेगारी पर्व वाढत आहे. तर दुसरीकडे मद्य विक्री परवाण्याची संख्या वाढवून जनजीवन विस्कळीत केले जात आहे. जिल्हाधिकारी पदावर अविनाश पाठक हे रुजू झाल्यानंतर त्यांनी आम्हाला शब्द दिला होता की, जिल्ह्यात एकही बिअर बार मंजूर करणार नाही. पण हा शब्द फेल ठरला. आणि त्यांनी वीस बिअरबार मंजूर केले. एक बिअरबारला पाच लाखापेक्षा जास्त खर्च येत असल्याचे काहींनी आम्हाला सांगितले. त्यामुळे बियरबारला मंजुरी देताना कोट्यावधींचा घोटाळा झाल्याची आणि भ्रष्ट कारभार झाल्याचे समोर येत आहे. प्रशासनापेक्षा बाहेरच्या लोकांनी मलिदा मारल्याची चर्चा आहे.

## नवीन लायसन देऊ नयेत!

■ जिल्ह्यातील लोकांनी लाजा सोडल्याने समाजाचे वाटोळ होत आहे. दारू दुकान मंजूर करणे, हा नियम असला, तरी सामाजिक हित, आणि नैतिकता पाहिली पाहिजे. कामधंदा नाही, बेकारी वाढली आहे. गुन्हेगारी वाढली आहे. अशात दारुडे वाढविणे म्हणजे समाज व्यवस्था विस्कळीत करणे आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आता तरी नवीन लायसन देऊ नयेत, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

## दारूड्यांच्या कुटुंबाचे वाटोळ करण्यात सहभाग नोंदवू नका!

■ दारू दुकाने वाढवण्याच्या मुद्द्याला आता आपण हात घालणार असून उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांच्यासह या खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे समाज बिघडू नका, सामाजिक स्वास्थ्य जागेवर राहू द्या, दारुड्यांच्या कुटुंबाचे वाटोळ करण्यात सहभाग नोंदवू नका, राज्याचा महसूल खूप मोठा आहे.

■ त्यातील भ्रष्टाचार कमी करा. त्याच बरोबर राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या माध्यमातून नवीन दारू दुकाने देऊन महसूल गोळा करण्याच्या भानगडीत पडून पाप करू नका, अशीही मागणी करणार असल्याचे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.



नवीन दारू दुकाने देऊन महसूल गोळा करण्याच्या भानगडीत पडून पाप करू नका

पान १ वरून

## धनूभाऊ प्रत्येकांवर

राहिलेले नाही.खंडणी आणि संतोष देशमुख यांच्या खुनाच्या प्रकरणाचा धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे. मात्र मुंडे यांच्यावर, त्यांच्या पक्षावर आणि सरकारवरही त्या मागणीचा अद्याप तरी काहीही परिणाम झालेला दिसत नाही. उलट, छगन भुजबळ यांच्यासारखे काही नेते धनंजय मुंडे यांची पाठराखण करत आहेत. येथे कराड आणि धनंजय मुंडे यांचे संबंध उघड दिसत आहेत, चिक्की घोटाळा तर कथित होता. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी पंकजा मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. मग धनंजय मुंडे आता स्वत: कशाची वाट पाहत असतील?

महाराष्ट्राला समृद्ध, सुसंस्कृत, शालीन राजकीय परंपरा आहे. २०१४ पासून आतापर्यंतचे राजकारण त्याला अपवाद ठरले आहे. किरकोळ आरोप झाला तरी मंत्री, मुख्यमंत्र्यांनी राजीनामे दिल्याचे महाराष्ट्राने पाहिले आहे. नैतिक जबाबदारी नावाची एक गोष्ट राजकारणात परवा परवापर्यंतत अस्तित्वात होती. ती जबाबदारी स्वीकारून नेते पदावरून पायउतार होत असत. आता राजकारणातली नैतिकता संपुष्टात आली आहे. नेत्यांना मतदारांचे भय राहिलेले नाही. आपल्या नेत्यांच्या नको त्या गुणांचाही उदो उदो करणारी पिढी तयार होणे, हे त्यामागच्या महत्वाच्या कारणांपैकी एक.

एक काळ असा होता की, राजकीय नेत्यांकडे आदराने पाहिले जायचे. त्यांच्याबद्दल लोकांमध्ये आदरयुक्त भीती असायची, कारण ते नेते नैतिकता पाळत असत. नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामे देणारे नेते अलीकडेही, म्हणजे २०१४ पूर्वीही झाले आहेत. त्यासाठी धनंजय मुंडे यांना फार मागे वळून पाहण्याची गरज नाही. कथित चिक्की घोटाळ्यात बहीण पंकजा मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी सभागृहात केली होती. तिथपर्यंतही धनंजय मुंडे यांनी वळून पाहिले असते तर त्यांनी केव्हाच राजीनामा दिला असता.

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर त्या प्रकरणाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. धनंजय मुंडे आणि त्यांच्या समाजाला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप होत आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड हे एकमेकांच्या अत्यंत जवळचे आहेत, हे दाखवणारे अनेक व्हिडीओ समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत. 'ज्यांच्याशिवाय धनंजय मुंडे यांचे पानही हालत नाही, ते वाल्मिक कराड... ' असे म्हणतानाचा पंकजा मुंडे यांचा व्हिडीओही प्रचंड व्हायरल झाला आहे. तरीही धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिलेला नाही. ते कशाची वाट पाहात आहेत, कुणाच्या आदेशाची वाट पाहात आहेत, अशी चर्चा सुरू झाली आहे.

संतोष देशमुख यांचा ज्या पद्धतीने खून झाला, त्यामुळे समाजात संताप निर्माण झाला आहे. आक्रोश मोर्चे काढले जात आहेत. रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. अशा परिस्थितीतही धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्याचा विचार केलेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांचीही मुंडे यांचा राजीनामा मागण्याची हिम्मत झालेली नाही.

फडणवीस हे २०१४ ते २०१९ दरम्यान मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांच्या अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. त्यावेळी त्यांनी सर्वांनी क्लीन चिट दिली होती. तीच परंपरा पुढेही सुरू राहणार काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## मुन्नी बदनाम हुई

एका वृत्तवाहिनीशी बोलताना सुरेश धस यांनी सांगितले की, मी ज्या मुन्नीचा उल्लेख केलाय, जी मुन्नी आहे तिला ते कळालेलं आहे. पण ती महिला भगिनी नाही आहे बरं का, नाही तर आणखी काही राळ उठायची. मी मुन्नी असा उल्लेख केला आहे. मात्र ती राष्ट्रवादीमधील पुरुष मुन्नी आहे. तसेच सुरेश धस माझ्याबाबतच बोलत आहे, हे त्या पुरुष मुन्नीला पक्कं माहित आहे. म्हणून कच्चेबच्चे लोक माझ्याविरोधात बोलायला पाठवू नका. तर स्वत: मुन्नीनेच समोर यावं, अशी विनंती मी मुन्नीला केली होती. तसेच मुन्नी आल्याशिवाय बोलायला मजा येणार नाही, असे सुरेश धस यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सुरेश धस यांनी उल्लेख केलेल्या मुन्नीवरून राजकीय वर्तुळाच बरीच चर्चा रंगली होती. तसेच याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्याकडेही विचारणा करण्यात आली होती. मात्र या प्रश्नावर अजित पवार हे चांगलेच संतापल्याचं दिसून आलं होतं. हा प्रश्न तुम्ही सुरेश धस यांनाच विचारा. हे असले फालतू गोष्टी कोणी बोलत असेल, तर मी स्पष्ट नाव घेऊन बोलणार आहे. त्यामुळे त्यालाच विचारा कोण आहे. असं म्हणत अजित पवार यांनी उलट सवाल केला होता.

## वाल्मिक कराडची

सुरेश धस म्हणाले,पुण्यातील जंगली महाराज रस्त्यामागे येणारा दुसरा रस्ता एफसी रस्ता आहे. एफसीरोडला प्रसिद्ध वैशाली हॉटेल आहे आणि वैशाली हॉटेलच्या पलीकडे सुनील सुशील पाटील बिल्डर आणि छाजेड त्याच्यामध्ये पार्टनर आहे. तिथे एफसी रोडवर आकांनी सात दुकानं बुक केली आहेत. पुण्यात बुक केलेल्या एका दुकानाची किंमत तब्बल ५ कोटी आहे. मी बिल्डकरकडून सर्व माहिती घेतली आहे. सात दुकानांपैकी चार दुकाने स्वत:च्या नावावर आणि तीन दुकाने ही दुसऱ्या पत्नीच्या नावावर आहेत. एवढच नाहीतर या दुकानाशेजारी आठवे दुकान हे विष्णू बहीण सोनावणे यांच्या नावावर आहे. मी स्वत: जाऊन त्यासंदर्भातील माहिती घेऊन आलो आहे.

वाल्मिक कराडचा हडपसरमधील एक फ्लॅट ७५ कोटीचा

मगरपट्ट्यामध्ये वाल्मिक कराडने ड्रायव्हरच्या नावावर संपूर्ण फ्लोअर बुक केला आहे. ॲमनोरा पार्क, मगरपट्टा सिटी इथे एका फ्लॅटची किंमत १५कोटी रुपये आहे. १५ कोटीला एक फ्लॅट असताना तिथे वाल्मिक कराडच्या ड्रायव्हरच्या नावावर इमारतीचा एक अख्खा फ्लोअरच आहे. फ्लोअरची किंमत ७५ कोटी आहे आणि हा संप्रूण फ्लोअरच आकांनी चालकाच्या नावावर केला आहे. एवढच नाही तर आकांनी फ्लोअर बुक करण्याअगोदर बिल्डरकडे संपूर्ण टेरेसच मागितला होता.मात्र बिल्डरने तो दिला नाही. आका अंबानीला मागे टाकतात की काय, आता अशीच शंका मला येऊ लागली.

वाल्मिक कराडच्या जमिनी कुठे कुठे?

जमिनींविषयी माहिती देताना सुरेश धस म्हणाले, शिमरी पारगाव इथे ५० एकर जमीन आहे. बार्शीत ५० एकर जमीन, शिमरी पारगाव इथे १० एकर जमीन, वॉचमनच्या नावावर १५ ते २० एकर जमीन, जामखेड १०-१५ एकर जमीन येथे जमीन आहेत.

## मुस्लिमांपाठोपाठ मराठा

विरोधात बोललो, असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. गुंडांच्या विरोधात बोलणे म्हणजे समाजाच्या विरोधात बोलणे कसे होऊ शकते, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. जे काही चालले आहे, त्याचे समर्थन करता येणार नाही. मुद्दा असा आहे, की मुस्लिम समाजात अशी जागरूकता का येत नाही?

काही कट्टर मुस्लिमांच्या कृत्यांचा दोष सर्व मुस्लिमांना कसा दिला जाऊ शकतो, असा प्रश्न विचारण्याचेही धाडस मुस्लिम समाजात राहिलेले नाही. सक्षम, अभ्यासू नेतृत्वाचा अभाव, हे त्याचे प्रमुख कारण आहे. शिक्षणाचा अभाव, ही मुस्लिम समाजाची सर्वात मोठी समस्या आहे. चौथी, सातवीनंतर शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. शाळा सोडून ही मुले पडेल ते काम करतात. शैक्षणिक चळवळीतील कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करून 'आमच्या शिक्षणाचं काय?' हे पुस्तक लिहिले आहे.

त्यांनी राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये फिरून शाळेची पायरी न चढलेल्या मुला-मुलींचे वास्तव या पुस्तकात मांडले आहे. मदरशात जाणाऱ्या मुलांची संख्या मोठी आहे. मदरशांत शिकवणाऱ्यांना तुटपुंजा पगार असतो. मदरशांत शिकणाऱ्या मुलांना नोकरी तरी कुठे मिळते? तलाकसारखी समस्या मुस्लिम समाजातही आहे. राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार मुस्लिमांची लोकसंख्या १२ टक्क्यांच्या घरात आहे. या समाजात बालमजुरीचे प्रमाण मोठे आहे. या समाजातील बहुतांश लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात.

राजकीय भानही हा समाज हरपून बसला आहे, अशा परिस्थितीत आरोप होतो, भारताला इस्लामिक राष्ट्र करण्याचा डाव आहे! हा आरोप हास्यास्पद असला तरी तो मुस्लिमांना अन्य समाजांपासून तोडणारा ठरला आहे, त्यांना मुख्य प्रवाहातून बाजूला सारणारा ठरला आहे. प्रार्थनास्थळात घुसून मारणार, काही मिनिटांसाठी पोलिसांना बाजूला सारा, मग दाखवून देऊ... अशा एक ना अनेक प्रकारच्या धमक्या दिल्या जातात.

अशा परिस्थितीत या समाजाची मानसिक स्थित कशी बनली असेल, याचा विचार सरकारने करायला हवा. देशात हिंदू समाजाची लोकसंख्या ८० टक्क्यांच्या घरात असताना देश इस्लामिक राष्ट्र कसा बनू शकतो, याचा विचार समाजाने करायला हवा. कट्टरतेला कट्टरता हे उत्तर असू शकत नाही, याचे भान दोन्ही समाजांनी ठेवायला हवे. काँग्रेसने मुस्लिमांचा अनुनय केला, हा मुस्लिम समाजावर सातत्याने होणारा आरोप.

काँग्रेसने अनुनय केला असता तर मुस्लिम समाज आज ज्या अवस्थेत आहे, त्या अवस्थेत राहिला असता का? याचाही विचार होताना दिसत नाही. राजकीय नेत्यांचे राजकारण होते, सत्ताकारण होते, समाज मात्र त्यात होरपळून निघत आहे. अनेक पिढ्यांपासून एकत्र राहिलेल्या या दोन्ही समाजांमध्ये राजकारणामुळे वितुष्ट निर्माण होत आहे. १२ टक्के लोकसंख्येला अडगळीत टाकून एखाद्या पक्षाला सत्ता मिळू शकेल, मात्र त्यामुळे शांततामय सहजीवन संपुष्टात येईल.

शेजाऱ्याच्या घराला लागलेली आग आपल्याही घराला घेरेल, हे दोन्ही समाजांतील कट्टर वर्गाला कळायला हवे. या सर्व बाबींमुळे मुस्लिम समाजात जागरूकतेचा अभाव आहे. प्रार्थनास्थळात, घरात घुसून मारण्याची भाषा का होते, याचे उत्तर या समाजाने सरकारला विचारायला हवे होते. समाजात ही मोठी समस्या असताना आता मराठा विरुद्ध ओबीसी असा वाद निर्माण होत आहे. गुंडांसाठी संपूर्ण समाजाला वेठीस धरू नये, ही भावना योग्यच आहे.

दुसरीकडे, मुस्लिमांना मात्र अनेक वर्षांपासून या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. समाजात अभूतपूर्व अशी गुंतागुंत निर्माण झाली आहे. हा गुंता लवकर सुटणे, हे राज्यासाठी हितावह आहे, याचे भान राजकीय नेत्यांनी, दोन्ही समाजांनी ठेवायला हवे. शांततामय सहजीवनाला पर्याय नाही, हे सर्वांनीच लक्षात घेण्याची गरज आहे. राजकारण्यांनी लावलेल्या आगीत आपण होरपळून निघणार नाही, याची काळजीही समाजाने घेतली पाहिजे.

अन्यथा मतांच्या राजकारणासाठी, सत्ता मिळवण्यासाठी चिथावणीखोर नेत्यांचा वापर यापुढेही करून घेतला जाईल, अशा नेत्यांना मंत्रिपदे दिली जातील. त्यांचे सर्वकाही व्यवस्थित होत राहिल. मूलभूत समस्यांकडे लोकांचे दुर्लक्ष होईल, समाजात दरी निर्माण होईल आणि त्याचा त्रास कारण नसताना पुढच्या पिढीलाही सहन करावा लागेल. त्यामुळे राज्यात सलोखा कायम राहणे, अत्यंत गरजेचे झाले आहे.

## सीआयडी कोठडीत

हाती लागल्याचे समजते. त्यामुळे वाल्मीक कराडचा पाय खोलात गेला असून कारवाईच्या भीतीने आता त्याचे झोप उडाल्याचं दिसत आहे.वाल्मीक कराड हा ३१ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यात शरण आला. यावेळी त्याच्यासोबत दोन व्यक्ती आणि पांढरी गाडी होती. ही गाडी आता सीआयडीने जप्त केली आहे. गाडीमालक शिवलिंग मोराळेसह अन्य मदत करणारे लोक देखील सीआयडीच्या रडारवर आहेत.

## संतोष देशमुखांचे

घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. तर, या प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दखल घ्यावी, अशी आग्रहाची विनंती केली होती. ज्यानंतर आता राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानेही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

खासदार बजरंग सोनवणे यांनी संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी ०३ जानेवारी रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली येथे आयुक्तांची भेट घेऊन मस्साजोग येथील घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. संतोष देशमुख कुटुंबीयांना मदत मिळवून देणेबाबत आयोगाला त्यांनी विनंती केली. सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना अत्यंत अमानवी आहे. यात मानव अधिकाराचे उल्लंघन झाले असल्यामुळे या प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दखल घ्यावी, अशी आग्रहाची विनंती त्यांनी केली होती. यानंतर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने खासदारांची विनंती मान्य करून मस्साजोग प्रकरणात गुन्हा क्र. ३३/१३/५/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करून घेतला आहे. आता या गुन्ह्यामधील तपास, पोलीस आणि न्यायव्यवस्था यावर राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांचे सुद्धा लक्ष असेल.

खासदार बजरंग सोनवणे यांच्या विनंतीनंतर राष्ट्रीय मानवाधिकार आयोग जिल्ह्यामध्ये तातडीने टीम पाठवून कारवाई करणार आहे. शिवाय या संपूर्ण घटनेचा अहवाल मागवणार असून ही टीम दिल्ली येथील असेल. घटनेच्या वेळी अथवा तपासामध्ये पोलिसांचे दुर्लक्ष झाले असल्यास राष्ट्रीय मानवाधिकार आयोग तसा अहवाल देते व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला याबाबत कारवाई करण्याचे अधिकार आहेत. आयोगाला न्यायिक व अर्धन्यायिक अधिकार आहेत. त्यामुळे आता या प्रकरणात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

## परळी तालुक्यात

नाही. परळी शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकाचा खून झालेला आहे. ही घटना उघडकीस आलेली आहे. संभाजीनगर व परळी ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत खुनाचा प्रत्येकी एक गुन्हा दाखल झालेला आहे. हा गुन्हादेखील उघडकीस आलेला आहे.

परळी शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत २०२४ मध्ये २४ अकस्मात मृत्यू झाले. विषारी द्रव पिऊन व आत्महत्या तसेच विविध कारणांमुळे मृत्यू झाल्याची नोंद आहे. परळी येथील संभाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अकस्मात मृत्यूच्या २५ घटना घडल्या आहेत. त्यामध्ये चारजणांची ओळख पटलेली नाही. परळी ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत ६६ अकस्मात मृत्यू घडले आहेत. त्यांपैकी दोघांची ओळख पटलेली नाही. सिरसाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत विविध कारणांनी ४६ अकस्मात मृत्यू झाल्याची नोंद आहे. यामध्ये रस्ता अपघातामध्ये दोघांचा मृत्यू झाला, अशी माहिती संबंधित पोलिस ठाण्याच्या सूत्रांकडून प्राप्त झाली.

## साहेब, वसूल

टिप्परने वाळू भरून किती खेपा केल्या, याची नोंद घेतली गेली, अवैध वाळू उत्खनन, बाजार मूल्य प्रतिब्रास, पाचपट दंडाची रक्कम यासह इतर शुल्क आकारून प्रत्येक वाहन मालकास नोटीस पाठविली. प्रत्येक वाहन मालकास १ कोटी रुपयांपेक्षा अधिक दंडाची रक्कम दिली गेली आहे. नोटीस प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत विवरणपत्रामध्ये आकारलेला दंड का वसूल करू नये? याबाबतचा खुलासा सादर करावा अन्यथा कारवाई करण्यात येईल, असेही आदेशित करण्यात आले आहे.